पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

यवतमाळ ● वर्ष १ ● अंक ८८ ● शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ३ ● पृष्ठे ४

RNI No.- MAMAR/ 26 /A4531 | Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

सकारात्मक विचार ही मोठी ताकद आहे, कारण ती कठीण काळात आशा देते.




# सरकारने घेतली राहुल गांधींच्या आंदोलनाची धास्ती!

## कॉँग्रेसचा भाजपवर 'हल्लाबोल' : कार्यक्रमापूर्वी बदनाम करण्याचा डाव

प्रतिनिधी | २१ ऑगस्ट

पुणे : पुण्यात राहुल गांधी यांचा आज 'छात्रो की गुंज' हा कार्यक्रम होत असून, याचा धसका सरकारने घेतला आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला बदनाम करण्यासाठी षडयंत्र रचले जात आहे, विविध आरोप करण्यात येत आहे, विद्यार्थ्यांवर दबाव आणला जात आहे. कार्यक्रमासाठी परदेशी फंडींग होत असल्याचाही आरोप करण्यात येत आहे. याचा खरपूस समाचार कॉँग्रेस नेत्यांनी घेत भाजपवर हल्लाबोल केला आहे. विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न कोण करत आहे, हेही तरुणांना चांगले समजते. राहुल गांधींची लोकप्रियता वाढत असल्याने भाजप आणि विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांचा राहुल गांधींशी होणारा थेट संवाद पाहून भाजपला धास्ती वाटत असून राहुल गांधींच्या कार्यक्रमाला बदनाम करण्यासाठी खोटा प्रचार केला जात आहे, कार्यक्रमाबाबत अफवा पसरवून संभ्रम निर्माण करणे, तसेच कार्यक्रमाविरोधात षडयंत्र रचले जात असल्याचा आरोप कॉँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. राहुल गांधींच्या उपस्थितीमुळे घाबरलेल्या भाजपने एका कार्यक्रमाला बदनाम करण्याचा प्रयत्न चालवला आहे, असे ते म्हणाले.



### भाजपवर लोकांचा विश्वास राहिला नाही : पटोले

काल एनएसयूच्या विद्यार्थ्यांना मारहाण करण्यात आली. याचा अर्थ भाजपवाले राहुल गांधींना घाबरले आहेत. कार्यक्रमाला गालबोट लावण्याचं काम सुरू आहे. भाजपच्या मनात भयभीतपणा दिसत आहे. विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. या अन्यायाविरोधात राहुल गांधींनी रणशिंग पुकारलं आहे. राहुल गांधींच्या सोबत तरुण आहेत, असं सांगतानाच भाजप शेवटचे हातपाय हलवत आहे. भाजपचं सरकार जाणार आहे. लोकांचा त्यांच्यावरचा विश्वास उडाला आहे, हे भाजपला कळून चुकलं आहे. भाजप सत्तेत राहिल्यावर देशाची संवैधानिक व्यवस्था संपुष्टात येईल असं तरुणांना आणि शेतकऱ्यांना वाटत आहे. भाजपबद्दलची चीड लोकांच्या मनात आहे, असं नाना पटोले म्हणाले.

### विद्यार्थी कॉँग्रेस नेत्यांच्या कॉलेजमधील- मुख्यमंत्री

कॉँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पुण्यातील कार्यक्रमासाठी येणाऱ्या ९० ते ९५ मुली या कॉँग्रेस नेत्यांच्या कॉलेजातील आहेत. या मुलामुलींना आणि सोशल इन्फ्लुएंसरला पैसे देऊन बोलावलं आहे. कार्यक्रमाचा केवळ पॉझिटिव्ह कंटेट टाका. नाही तर पैसे देणार नाही, असं या सोशल इन्फ्ल्यूएंसरला सांगण्यात आलं आहे, असा खळबळजनक गौप्यस्फोट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. मीडियाशी संवाद साधताना त्यांनी हा गौप्यस्फोट केला आहे. तसेच राहुल गांधी यांच्या कार्यक्रमाबाबत नवनाथ बन यांनी केलेल्या आरोपांची चौकशी केली जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

### राहुल गांधी देशाचे नेते - खा. संजय राऊत

सप्टेंबर महिन्यानंतर महाराष्ट्रातील सरकारची पडझड सुरू होईल, सत्तेचे कवचकुंडल असेपर्यंत भाजपची दादागिरी दिसेल, सत्ता गेल्यानंतर ९० टक्के भाजप नेते बिळात जातील, अशी टीका केली. राहुल गांधींच्या पुणे दौऱ्यावरून भाजपने केलेल्या विरोधाला त्यांनी दहशतवाद म्हटले असून, राहुल गांधी देशाचे नेते असल्याचे प्रतिपादन खा. संजय राऊत केले.

## »थोडक्यात

### शिवसेनेच्या महिला जिल्हाप्रमुखांचा सेनेला जय महाराष्ट्र

**अहिल्यानगर :** शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे नुकतेच शिंदे यांच्या शिवसेनेत सामील झाल्याने शिर्डीत शिंदेंच्या शिवसेनेची ताकद वाढली असतानाच पक्षाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. शिवसेनेच्या महिला जिल्हाप्रमुख विमल पुंडे यांच्यासह अनेक प्रमुख महिला पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदांचा आणि प्राथमिक सदस्यत्वाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा पक्षाचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठवला आहे.

---

### लेकराला वाचवण्यात तिघांनी जीव गमावला!

**छ. संभाजीनगर :** जिल्ह्यातील तिसगाव परिसरातील धुळे-सोलापूर महामार्गाच्या जवळीलखवड्या डोंगरावर शुक्रवारी सकाळी दहाच्या सुमारास कुणाल चांदगुडे आत्महत्या करण्यासाठी आला होता. त्यावेळी त्याचे आई-वडीलही त्याच्या मागे खवड्या डोंगरावर चढले. 'आत्महत्या करू नको,' अशी त्यांनी अनेकदा विनवणी केली. मात्र, कुणाल डोंगराच्या काठावर उभा होता. त्याला वाचवण्यासाठी त्याचे आई-वडील व परिसरातील नागरिक, पोलिस, अग्निशमन विभाग प्रयत्न करीत होते. त्यावेळी कुणालचे वडील त्याला पकडण्यासाठी त्याच्या जवळ गेले असता दोघांचाही तोल जाऊन दरीत पडले हे दृश्य पाहून कुणालच्या आईनेसुद्धा दरीत उडी मारली.

# सरकारच्यावतीने सत्तारांनी केलेली मनधरणी निष्फळ!

प्रतिनिधी | २२ ऑगस्ट

**छत्रपती संभाजीनगर :** २९ ऑगस्टपासून मनोज जरांगेंकडून आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे, या पार्श्वभूमीवर अब्दुल सत्तार यांनी मनोज जरांगे पाटील यांची आज भेट घेत तासभर चर्चा केली. सरकार तुमच्या मागण्यांबाबत सकारात्मक आहे, त्यामुळे उपोषण टाळा अशी विनंती यावेळी सत्तार यांनी मनोज जरांगे पाटील यांना केली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोघेही तुमच्या विरोधात नाही, हे मी तुम्हाला खात्रीने सांगतो, तुमच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक आहे, तुम्ही तब्येतीची काळजी घ्या, असंही यावेळी सत्तार यांनी म्हटलं आहे. मात्र जरांगे पाटील 'वर्षा'वरील आंदोलनावर ठाम राहिल्याने ही चर्चा निष्फळ ठरली असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.



मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मोठी घोषणा केली आहे, ते येत्या २९ ऑगस्टपासून आमरण उपोषणाला बसणार आहेत. कुणबी प्रमाणपत्र रद्द होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर त्यांनी येत्या २९ ऑगस्टपासून आंदोलनाची हाक दिली आहे, या आंदोलनात समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनदेखील त्यांनी केले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर आता सरकार दरबारी हालचालीला सुरुवात झाली आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी आज मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे. यावेळी दोघांमध्ये तब्बल एक तासांपेक्षा अधिक चर्चा झाली. यावेळी बोलताना, सरकारने समाजाचं वाटोळं केलं, आता उपोषण करणारच असं सत्तार यांना मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. समाजाशी दगा करून आपण कधीच जगू शकत नाही, असंही ते यावेळी म्हणाले आहेत. आम्ही मुंबईत येणार, आम्ही म्हणतो फडणवीस साहेब आमचे, मग तुम्हाला आम्हाला वर्षा बंगल्यावर बसू द्यायला काय हरकत आहे? आम्ही खोलीत बसत नाहीत, बंगल्यावर बसू, आम्ही वर्षावर आंदोलन करण्यावर ठाम आहोत. असं यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

### राहुल गांधी येण्यापूर्वी एनएसयूआय -एबीव्हीपी भिडले!

**पुणे :** कॉँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी पुण्यात 'छात्रों की गूंज' हा विद्यार्थी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मात्र राहुल गांधी येण्यापूर्वीच रात्री पुण्यात मोठा राडा पाहायला मिळाला. विद्यार्थी संघटनांमध्ये मोठा वाद उफाळून आला. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि कॉँग्रेस संलग्न 'एनएसयूआय'च्या कार्यकर्त्यांमध्ये कॉलेज शुल्काच्या मुद्यावरून जोरदार बाचाबाची व राडा झाला. दोन्ही बाजूंच्या समर्थकांनी एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी केल्याने परिस्थिती तापली होती. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. या राड्यानंतर कॉँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही घटनास्थळी भेट दिली.

# 'छात्रों की गुंज' नाही ही तर 'पैसे की गुंज'!

## भाजपचा आरोप, गर्दी जमवण्यासाठी कोट्यवधींचे 'रेट कार्ड'

प्रतिनिधी | २२ ऑगस्ट

**पुणे :** आज कॉँग्रेस नेते राहुल गांधी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत, ते पुण्यामध्ये 'छात्रों की गुंज' कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर कॉँग्रेसकडून जोरदार वातावरण निर्मिती सुरू असल्याचे पहायला मिळत आहे. तर दुसरीकडे राहुल गांधी यांच्या पुणे दौऱ्यापूर्वीच शुक्रवारी रात्री एनएसयू आणि अभाविपमध्ये जोरदार राडा झाल्याचं पहायला मिळालं आहे.

दरम्यान त्यानंतर आता राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गुंज' कार्यक्रमावरून भाजपने राहुल गांधी यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी या कार्यक्रमावरून राहुल गांधी यांच्यावर जोरदार हल्लाबोल करताना ही छात्र की गुंज नाही



ही तर 'पैसे की गुंज' असल्याचे म्हटले आहे. राहुल गांधींचा पुण्यातील 'छात्रों की गूंज' नाही तर 'पैसों की गूंज' कार्यक्रम आहे.

राहुल गांधींच्या कार्यक्रमाला लोक उत्स्फूर्तपणे येत नाहीत, म्हणून कॉँग्रेस पैसे देऊन गर्दी जमवत आहे. राहुल गांधींच्या कार्यक्रमातून कॉँग्रेसचे नवे पीपीपी मॉडेल म्हणजे 'पेड पॉलिटिकल प्रोग्राम' समोर आले आहे. असा आरोप यावेळी भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी केला आहे, दरम्यान त्यांनी यावेळी काही व्हिडीओ देखील दाखवले आहेत. मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. राहुल गांधींच्या पुण्यातील कार्यक्रमासाठी समाजमाध्यमांवरील प्रभावशाली व्यक्तींना प्रत्येकी ३० ते ३५ हजार रुपये देण्याची ऑफर देण्यात आली.

या संपूर्ण प्रकरणामागे नेमका कोणाचा हात आहे, याची चौकशी सरकारने करावी, अशी मागणी यावेळी नवनाथ बन यांनी केली आहे. सुमारे ३ हजार लोकांना प्रत्येकी ३० ते ३५ हजार रुपये देऊन कार्यक्रमाला आणले जात असेल, तर त्यासाठी तब्बल ९ ते १० कोटी रुपये खर्च होतात. म्हणजे राहुल गांधींना पुन्हा राजकीयदृष्ट्या रिलॉंच करण्यासाठी केवळ गर्दी जमवण्यावरच जवळपास दहा कोटी रुपयांचा खेळ सुरू असल्याचा आरोप यावेळी नवनाथ बन यांनी केला आहे .

## CLASSIFIED

**प्रवेश देणे सुरू आहे**

आय.टी.आय.व १२ वी समकक्ष कोर्सेस

१) इलेक्ट्रीशियन २ वर्ष
(२) बांधकाम पर्यवेशक १ वर्ष प्रवेश
पात्रता १० वी, १२ वी पास / नापास, टक्कवारीची अट नाही
डायरेक्ट ऑनलाईन प्रवेश

संपर्क
स्नेहदीप व्होकेशनल
ज्युनिअर कॉलेज, SBI बँकेच्या वरं, राठीनगर, अमरावती
मो. नं.- 8087958087

**शेती विकणे आहे**

मौजा चांदूर, ता.जि अकोला येथील शेत सर्व्हे नं. 188/2आईच्या शाळेसमोर व प्रभात किड्सच्या मागील बाजूस, नगर पालिकेच्या बॉर्डरला लागून उत्तम लोकेशनचे आहे. लेआउटचे शेत 84 आर. लेआउटचे शेत विकणे आहे.

संपर्क : शरदचंद्र नेवास्कर
मो. नं.- 9822702276

# राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी राज्यातील चार शिक्षकांची निवड!

प्रतिनिधी | २२ ऑगस्ट

**मुंबई :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देण्याचं काम शिक्षक करत असतात. शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या देशभरातील ४८ शिक्षकांची राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील चार शिक्षकांचा समावेश आहे. शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागामार्फत हा पुरस्कार दिला जातो. नावीन्यपूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्त्व विकास, शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेले प्रयत्न तसेच सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या राष्ट्रीय पुरस्काराचे महाराष्ट्रातील चार मानकरी म्हणून डॉ. कविता नृसिंहराव गिट्टे (बीड), कुंदा जयवंत बच्छाव (नाशिक),वैभव वसंतराव कुलकर्णी (लातूर) आणि शिवप्रसाद अरविंद टिंगरे (सातारा) यांची निवड झाली आहे. ही राज्यासाठी गौरवाची व अभिमानाची बाब आहे.

### तीन टप्प्यांत निवड प्रक्रिया

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी यंदा जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा तीन टप्प्यांत निवड प्रक्रिया राबविण्यात आली. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या राष्ट्रीय पोर्टलवर १५ जून ते २० जुलै २०२६ या कालावधीत पात्र शिक्षकांकडून ऑनलाइन स्व-नामांकन मागविण्यात आले होते. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, नावीन्यपूर्ण अध्यापन, व्यक्तिमत्त्व विकास, शाळेच्या गुणवत्तावाढीसाठीचे प्रयत्न आणि वंचित घटकांसाठी केलेले कार्य या निकषांवर मूल्यमापन करून अंतिम ४८ शिक्षकांची निवड करण्यात आली.




# १० लाख मेट्रिक टन साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी!

## केंद्र सरकारचा निर्णय; सणासुदीत साखरेचा गोडवा राहणार कायम

प्रतिनिधी | २२ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** सणासुदीचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच सर्वसामान्य ग्राहकांना महागाईचा फटका बसू नये, यासाठी केंद्र सरकारने आता मोठं पाऊल उचलले आहे. वाढत्या किमती आणि घटत चाललेल्या पुरवठ्याच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता सुधारण्यासाठी सरकारने १० लाख मेट्रिक टन साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या दोन महिन्यांत साखरेच्या दरात सुमारे ४० टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे.



परकीय व्यापार महासंचालनालयाने गुरुवारी एक अधिसूचना जारी करून, कच्च्या साखरेच्या आयातीवरील शुल्क मर्यादा तात्पुरती हटवली आहे. गेल्या काही आठवड्यांपासून साखरेच्या किमती सातत्याने वाढत होत्या. ऑगस्टच्या सुरुवातीला, किरकोळ साखरेचे दर ४८ ते ५० रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचले होते, तर घाऊक दर ४,७५० ते ४,८०० रुपये प्रति क्विंटलच्या दरम्यान होते. अशातच, आता, ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत, १० लाख टन कच्ची साखर कोणत्याही आयात शुल्काशिवाय देशात आयात केली जाईल. ही सूट टॅरिफ रेट कोटा अंतर्गत देण्यात आली आहे, याचा अर्थ ही सुविधा केवळ एका विशिष्ट प्रमाणासाठी उपलब्ध असेल, त्यानंतर जुने शुल्क पुन्हा लागू होईल, अशी माहिती आहे. यापूर्वी, आयात धोरण शुल्कमुक्त होते, परंतु त्यात कोणत्याही विशेष अटींचा उल्लेख नव्हता. आता, ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत, १० लाख मेट्रिक टनच्या शुल्क-मुक्त दर कोट्याच्या समावेशासह हे धोरण शुल्क-मुक्त राहील.

### साखर उत्पादक देशावरच आयातीची नामुष्की

ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून कोल्हापूरमध्ये घाऊक दरात जवळपास २०टक्के वाढ झाली असून, दर प्रति क्विंटल ५,३५० या विक्रमी उच्चांकावर पोहोचले आहेत! विशेष म्हणजे, भारत हा जगातील दुसरा सर्वात मोठा साखर उत्पादक आणि सर्वात मोठा ग्राहक आहे. जर ही आयात झाली, तर जवळपास दहा वर्षांत प्रथमच भारत परदेशातून साखर आयात करेल. म्हणजे साखरेची निर्यात करणाऱ्या देशावरच आता आयातीची नामुष्की ओढवण्याची शक्यता आहे.






सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

२

शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

## श्रावण मासी हर्ष मानसी

'श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे...' कवी बालकवींची ही ओळ आठवताच डोळ्यांसमोर उभा राहतो तो हिरवागार आणि प्रसन्न श्रावण महिना. आषाढाच्या मुसळधार आणि धोधो कोसळणाऱ्या पावसानंतर येणारा श्रावण मनाला एक वेगळीच शांतता आणि आनंद देऊन जातो. श्रावणाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा उन-पावसाचा खेळ. क्षणात लख्ख ऊन पडते, तर दुसऱ्याच क्षणात रिमझिम पाऊस सुरू होतो. या ऊन-पावसाच्या खेळातून आकाशात उमटणारे सप्तरंगी इंद्रधनुष्य पाहणे हा एक अद्भुत अनुभव असतो. निसर्ग जणू हिरवा शालू पांघरून सजलेला असतो. झाडे-वेली नव्या नवतीमध्ये न्हाऊन निघतात आणि सृष्टीचा ताजेपणा मनाला भुरळ घालतो. हा महिना केवळ निसर्गाच्या सौंदर्याचा नसून भक्ती आणि सणांचाही आहे. श्रावणी सोमवार, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन आणि गोकुळाष्टमी यांसारखे अनेक सण याच महिन्यात येतात.

# सहाय्यक प्राध्यापक भरती बाबत संभ्रमावस्था?

महाराष्ट्रात सार्वजनिक विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालयात मोठ्या प्रमाणात असलेल्या रिक्त असलेल्या सहायक प्राध्यापक पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यात ५०१२ सहाय्यक प्राध्यापकाची पदे ही अनुदानित महाविद्यालयांतील तर ६०० सहाय्यक प्राध्यापकाची पदे सार्वजनिक विद्यापीठांमधील आहेत. पारदर्शकता हे प्रभावी सरकारचे मूळ तत्त्व आहे. सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रिया ही संगणकीय प्रणाली राबवून केल्यास उमेदवारांच्या गुणांची पडताळणी,निवड यादी आणि निकाल तयार करण्याचे काम स्वयंचलित पद्धतीने होईल.त्या अनुषंगाने,महाराष्ट्र शासनाने, पूर्वीच्या पारंपरिक पद्धतींमधील वशिलेबाजी आणि त्रुटी टाळण्यासाठी, सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता आणण्यासाठी संगणकीय प्रणालीचा वापर करण्याचे ठरविले आहे. या भरती प्रक्रियेत अर्जापासून अंतिम निवडीपर्यंत, प्रत्येक टप्पा, संगणकीय प्रणाली द्वारे करण्यात येणार आहे व त्यात उमेदवारांच्या प्रत्येक गुणांची नोंद करण्यात येणार आहे, तसेच गुणवत्ता यादी स्वयंचलित पद्धतीने तयार करण्यात येण्यामुळे भरती प्रक्रिया ही 'पारदर्शक' होईल,असे प्रथमदर्शनी दिसते.

महाराष्ट्र शासनाने ११ फेब्रुवारी,२०२६ रोजी दोन शासकीय निर्णय जाहीर केले. त्यात एक सार्वजनिक विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रिया संबंधी व दुसरा अनुदानित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रिया संबंधी.

उच्च शैक्षणिक संस्थांची (विद्यापीठे/महाविद्यालये) बिंदू नामावली तपासून त्यांना 'ना हरकत प्रमाणपत्र' हे डीएचई (एनओसी) पोर्टलव्दारे देण्यात येत आहे. यामुळे पदांना पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने मंजुरी मिळते. मुलाखती दरम्यान होणारा पक्षपात रोखण्यासाठी सर्व उमेदवारांच्या मुलाखतींचे संगणकीय प्रणालीद्वारे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे बंधनकारक केले आहे. उमेदवारांना मिळालेले वैयक्तिक गुण उच्च शैक्षणिक संस्थांच्या अधिकृत संकेतस्थळांवर प्रसिद्ध केले जाणार आहे, जेणेकरून संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता राहील.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ८ मार्च,२०१९ ला प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयानुसार उच्च शैक्षणिक संस्थांना आलेल्या अर्जांमधून मुलाखतीसाठी निवड यादी ही शासन निर्णयात नमूद असलेल्या परिशिष्ट ॥ मधील विद्यापीठांसाठी '३अ' आणि महाविद्यालयांसाठी '३ब' तक्त्यात दिलेल्या शैक्षणिक गुणांच्या आधारावर करावी लागते. हे गुण केवळ उमेदवारांना मुलाखतीसाठी निवडण्याकरिता विचारात घेतले जातात आणि अंतिम निवड ही केवळ मुलाखतीतील कामगिरीवर आधारित करावी लागते.

विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रियेत ६०-२०-२० चे नवीन सूत्र लागू करण्यात आले आहे. ६० टक्के गुण शैक्षणिक व संशोधन पात्रता,२० टक्के गुण अध्यापन कौशल्य चाचणी आणि २० टक्के गुण मुलाखतीसाठी निश्चित करण्यात आले आहेत, याचा अर्थ मुलाखत आणि वर्गातील अध्यापन कौशल्याला ४० टक्के भारांश देण्यात आला आहे. त्यामुळे येथे ४० टक्के मुल्यमापन हे व्यक्तीनिष्ठ असल्याने मानवी हस्तक्षेप व गैरप्रकार किंवा पक्षपाताची शक्यता नाकारता येत नाही.निवड समितीच्या सदस्यांच्या वैयक्तिक आवडी-निवडीवर गुण अवलंबून राहू शकतात. त्यामुळे येथे वशिलेबाजी आणि भ्रष्टाचाराला वाव आहे.

अनुदानित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रिया संबंधित शासन निर्णयात, भरती प्रक्रिया ही विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच सहाय्यक प्राध्यापक पदाकरीता निहीत केलेल्या निकषांचे पालन करूनच अहर्तापात्र उमेदवारांमधून पदभरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात येईल व पदभरतीमध्ये कोणतीही अनियमितता/अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संचालक,उच्च शिक्षण,पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांची राहील,एवढेच नमूद केले आहे. त्यामुळे ८ मार्च २०१९ च्या शासन भरती प्रक्रियेनुसार आलेल्या पात्र उमेदवारांमधून निवड यादी तयार करण्यासाठी एकूण १०० गुणांपैकी ९० गुण हे शैक्षणिक कामगिरीसाठी, ज्यात कमाल ८४ गुण,०६ गुण संशोधनासाठी व १० गुण शिकविण्याचा अनुभव यावर राहणार आहे. यामध्ये पीएचडी अधिक एमफिल धारकांना २५ गुण,१० गुण जीआरफ अधिक नेट उत्तीर्ण उमेदवारांना, ०८ गुण नेट साठी व सेट /स्लेट उत्तीर्ण उमेदवारांना ०५ गुण देण्यात येणार आहे. पण नंतर महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ५ मार्च,२०२४ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार नेट/सेट/स्लेट हीच उच्च शैक्षणिक संस्थांमधील सहाय्यक प्राध्यापक पदासाठी किमान पात्रता असणार आहे व फक्त पीएचडी धारकांना या परीक्षेपासून सूट देण्यात आली आहे. त्यामुळे वरील प्रकारे गुण देणे पण निश्चितच चूकीचे व अन्यायकारक ठरेल. तसेच या १०० गुणांच्या आधारावर उमेदवारांची निवड यादी करण्यात येणार आहे. यात अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांपैकी किती उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलवायचं हा अधिकार उच्च शैक्षणिक संस्थांनाच राहणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलवून उच्च शैक्षणिक संस्था त्यांच्यात स्पर्धा (अनैतिक?) निर्माण करून स्वतःचे उखळ पांढरे करण्याची शक्यता नाकारता येत नाही. यात अध्यापन कौशल्य व मुलाखतीसाठी किती गुण राहतील याबद्दल उल्लेख पण नाही,हे विशेष. त्यामुळे अनुदानित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रियेत तर पात्र उमेदवारांपैकी कोणता उमेदवार निवडायचा याचे पुर्ण अधिकार निवड समितीला,ज्याचे अध्यक्ष हे महाविद्यालय चालविणाऱ्या खाजगी शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष असतात, देण्यात आल्याने ही भरती प्रक्रिया १०० टक्के व्यक्तिनिष्ठ मुल्यमापनाव्दारे होणार हे निश्चित. महाराष्ट्र शासनाने ११ फेब्रुवारी,२०२६ रोजी एकाच दिवशी प्रसिद्ध केलेल्या एक सार्वजनिक विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक भरती संबंधित व दुसरा अनुदानित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक भरती संबंधित. या शासन निर्णयांमध्ये विद्यापीठ भरती प्रक्रियेत ६०:२०:२० चे सूत्र दिले आहे,तर अनुदानित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रियेत कोणतेही सूत्र दिलेले दिसत नाही.असा भेदभाव का,याबद्दल उमेदवारांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

व्यक्तीनिष्ठ मुल्यमापनाच्या,जसे मुलाखती किंवा वर्गातील अध्यापन कौशल्य, गुणांवरून भारतात अनेक न्यायालयीन लढे झाले आहेत. सुप्रीम कोर्टाचे काही ऐतिहासिक निर्णय या संदर्भात दिशादर्शक ठरतात.अशोक कुमार यादव विरुद्ध हरियाणा राज्य(१९८५) खटल्यातील ऐतिहासिक निकाल हा सार्वजनिक नोकरी आणि निष्पक्षता संदर्भातील भारतीय प्रशासकीय कायद्याचा एक आधारस्तंभ आहे. सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, मुलाखतींना एकूण गुणांची अवास्तव टक्केवारी दिल्यास ते मनमानी आणि पक्षपाताला पोषक वातावरण निर्माण करू शकते.मुलाखतींचे गुण सामान्यतः एकूण गुणांच्या १२.५ टक्के ते १५ टक्के च्या आसपास असावेत, असे स्पष्ट मत विविध खटल्यांत न्यायालयाने मांडले आहे.अजय हासिया विरुद्ध खालिद मुजीब सेहरावर्दी या ऐतिहासिक खटल्यात, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, मनमानी सरकारी कृती,ज्यात पूर्णपणे असमतोल किंवा अवाजवी मुलाखतीचे निकष समाविष्ट आहेत, घटनेच्या अनुच्छेद १४ अंतर्गत समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करते.न्यायालयाने हे स्पष्ट नमूद केले की तोंडी मुलाखतींना अवाजवी किंवा व्यक्तिनिष्ठ महत्त्व दिल्याने पक्षपात आणि हेराफेरीला वाव मिळतो.

नुकतेच, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने, ११ फेब्रुवारी,२०२६ ला महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या सार्वजनिक विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रियेला आव्हान देण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा *विद्यापीठाला सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रिया सुरू ठेऊन अंतिम निवड यादी जाहीर न करण्याचे निर्देश दिले आहेत.* मुलाखत व अध्यापन कौशल्य यासाठी ४० टक्के गुण दिल्याने, या ४० टक्के गुणांसाठी मुल्यमापन हे 'व्यक्तीनिष्ठ' प्रकारचे असून येथे पक्षपातीपणा व भ्रष्टाचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही,असा आरोप याचिकेत केलेला आहे.उच्च न्यायालयाला या आरोपात प्रथमदर्शी तथ्य दिसल्याने, विद्यापीठाला अंतिम निवड यादी जाहीर न करण्याचे निर्देश दिले आहेत. उद्या हीच बाब महाविद्यालयीन सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रियेला लागू होऊ शकते कारण येथे तर गुणांच्या आधारे उमेदवारांना मुलाखतीला बोलविल्यानंतर, १०० टक्के निवड ही व्यक्तीनिष्ठ मुल्यमापनाव्दारे होणाची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अनुदानित महाविद्यालयांमध्ये ५०१२ सहायक प्राध्यापक पदे असल्याने,येथे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होण्याची शक्यता पण नाकारता येत नाही. एकंदरीत सद्यस्थितीत, महाराष्ट्रातील सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आहे असे छातीठोकपणे सांगता येणार नाही. कागदावर हे बदल खूप चांगले वाटत असले, तरी प्रत्यक्ष जमिनीवरील वास्तवात भरती प्रक्रियेत अजूनही अनेक गंभीर त्रुटी जाणवतात. उमेदवारांच्या मनात या भरती प्रक्रियेबद्दल प्रचंड अविश्वास आहे.*त्यामुळे महाराष्ट्र शासनाने तातडीने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा निर्देश डोळ्यासमोर ठेवून सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रियेच्या नियमांमध्ये सुधारणा करून व संगणकीय प्रणालीचा वापर करून यात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न करावा. तसेच संपूर्ण भरती प्रक्रिया एका केंद्रीय व निष्पक्ष यंत्रणेमार्फत राबवली जाण्याबाबत गांभीर्याने विचार करावा,* जेणेकरून, उमेदवारांमध्ये असलेली संभ्रमावस्था दूर होईल व सहाय्यक प्राध्यापक पदासाठी बरेच वर्षांपासून वाट पाहणाऱ्या लाखों इच्छुक उमेदवारांना दिलासा व न्याय मिळेल.

**प्रा.डॉ.संजय खडक्कार,**
माजी तज्ज्ञ सदस्य,
विदर्भ वैधानिक विकास मंडळ

## प्रश्न विचारणे म्हणजे 'दिमागी नक्षलवाद' नव्हे

लोकशाहीत सरकार असते ते जनतेसाठी, आणि जनता असते ती सरकारला प्रश्न विचारण्यासाठी. प्रश्न विचारणे हा अपराध नाही; तो लोकशाहीचा प्राण आहे. निवेदन देणे, आंदोलन करणे, उपोषण करणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, शासनाकडे सुविधा मागणे आणि सत्ताधाऱ्यांना त्यांच्या निर्णयांचा जाब विचारणे हे भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेले लोकशाही अधिकार आहेत. त्यामुळे सरकारच्या धोरणांवर टीका करणाऱ्या प्रत्येक आवाजाला 'नक्षलवादी', 'शहरी नक्षलवादी' किंवा 'दिमागी नक्षल' अशा विशेषणांनी हिणवणे ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक प्रवृत्ती ठरू शकते.

१५ ऑगस्ट २०२६ रोजी लाल किल्ल्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'दिमागी नक्षल' हा शब्दप्रयोग केल्याच्या संदर्भाने सध्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा सुरू आहे. या शब्दप्रयोगाचा नेमका संदर्भ आणि त्याचा उद्देश काहीही असो; परंतु त्यातून एक मूलभूत प्रश्न उभा राहतो सरकारला प्रश्न विचारणारा प्रत्येक नागरिक संशयाच्या पिंजऱ्यात उभा करायचा का? पेपर लीकच्या विरोधात रस्त्यावर उतरलेली तरुणाई 'दिमागी नक्षल' आहे का? शाळांमध्ये स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, प्रयोगशाळा, शिक्षक आणि आवश्यक सुविधा मिळाव्यात, अशी मागणी करणारी मुले 'दिमागी नक्षल' आहेत का? शेतकरी आपल्या मालाला योग्य भाव मागतो म्हणून तो देशविरोधी ठरतो का? विद्यार्थी परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकारांविरोधात आवाज उठवतो म्हणून तो राष्ट्रद्रोही ठरतो का? सामान्य नागरिक भ्रष्टाचाराविरुद्ध तक्रार करतो, निवेदन देतो किंवा आंदोलन करतो म्हणून त्याच्यावर 'नक्षल' असा शिक्का मारायचा का? जर या प्रश्नांची उत्तरे 'होय' असतील, तर मग लोकशाही आणि सत्तेतील संवाद यांच्यात उरणार तरी काय? "चतुर सत्ता प्रत्येक मूर्खाला 'देशभक्त' आणि प्रत्येक बुद्धिमान प्रश्नकर्त्याला 'देशद्रोही' बनवते," अशी उपरोधिक उक्ती आज समाजमाध्यमांवर फिरताना दिसते. तिचा शब्दशः अर्थ स्वीकारण्यापेक्षा तिच्या मागचा लोकशाही विषयक इशारा समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. देशभक्तीचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार कोणत्याही राजकीय पक्षाकडे नसतो.

**गजानन ओंकार हरणे**
खडकी अकोला.

## आईच्या स्मरणार्थ चौदा महिलांना पंढरपूर दर्शन

श्री गुरुदेव सेवा मंडळ अकोला तर्फे दरवर्षी पंढरपूर वारी यात्रा गुरुदेव विचारपीठ द्वारे काढण्यात येते

आर्थिक कमकुवत असेलेल्या निराधार चौदा (१४ )महिलांना, स्व .रमाबाई रामभाऊ मांडेकर यांनी १०३ वर्ष कौंटुबिक सेवा करून या देहाचा त्याग केला. या आईच्या त्यागमय जीवन का याच्या स्मृति निमित्त गरजु भाविक गुरुदेव प्रेमी १४ महिलाना आषाढी महिन्यात पंढरपूर दर्शन घडवून आणले .




ह्या चौदा महिला संपूर्ण खर्च मांडेकर परीवारांनी फुलाप्रमाणे झेलला आणि महिलानी सुद्धाभक्ती सेवा प्रदान केली महिलांना मंडळीनी पंढरपूरचा विठोबा व रुखमाई पावल्याचा परमानंद शब्दातून व्यक्त केला. या सामाजिक भक्तीपुर्ण कार्या बदल पंढरपूर येथील धर्मशाळेत किर्तन समयी गोपाल मांडेकर यांचा सपत्नीक सत्कार गुरुदेव मंडळातर्फे सेवा प्रदान केल्याबद्दल करण्यात आला. यावेळी आचार्य श्री. वेरुळकर गुरुजी, आजीवन प्रचारक श्री.काळे महाराज ॲड. साबळे मॅडम, श्री गंगाधर राव पाटील,, श्री. नेरकर दादा उद्धव भाऊ वानखडे गुरुदेव मोझरी प्रचारक अकोला गुरुदेव सेवा मंडळाचे संयोजक व संचालन श्री . भानुदास कराळे यांनी केले याप्रसंगी अनेक गुरुदेव सेवाभक्त मंडळी पंढरपूर येथे हजर होते . असे गुरुदेव प्रेमी विष्णूपंत जोध यांनी कळविले आहे.

## मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील कलासक्त राजबिंडे अभिनेते सूर्यकांत मांढरे

चित्रकारांची खाण, जयप्रभा स्टुडिओ व चित्रनगरी यामुळे चित्रपटसृष्टीचे माहेर अशी कोल्हापूरची ख्याती. कलाकारांनी संपन्न असलेल्या या शहराला कलापूर असेही म्हटले जाते. जवळपास अर्धशतकाहून अधिक काळ मराठी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजविणारे चंद्रकांत-सूर्यकांत हे बंधुद्वय याच करवीरनगरीचे. पृथ्वीतलावरचे हे चंद्र-सूर्य मराठी रसिकांच्या हृदयात अढळ स्थान करून आहेत. त्यातील सूर्यकांत केवळ अभिनेते नव्हते, तर लेखक, चित्रकार, शिल्पकार, निर्माता, दिग्दर्शक आणि ग्रामीण चित्रपटांतील 'गावचा पाटील' ही भूमिका समर्थपणे वठविणारे अशी सूर्यकांत मांढरे यांच्या व्यक्तिमत्त्वाची बहुआयामी रूपे होती.

सूर्यकांत मांढरे यांचे जन्मनाव वामन तुकाराम मांढरे असून व्यावसायिकरित्या सूर्यकांत म्हणून ओळखले जातात. त्यांनी १०० हून अधिक चित्रपटांमध्ये अभिनय केला. मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील महान आणि प्रभावशाली अभिनेत्यांपैकी एक म्हणून त्यांना ओळखले जात. अभिनेते आणि चित्रपट निर्माते चंद्रकांत मांढरे हे सूर्यकांत यांचे मोठे भाऊ आहेत. भारत सरकारने त्यांना

**आज स्मृतिदिन**

कलेतील योगदानाबद्दल १९७३ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले.

सूर्यकांतने वयाच्या बाराव्या वर्षी भालजी पेंढारकर यांच्या ध्रुवमध्ये बालकलाकार म्हणून आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली , १९४३ साली पेंढारकर यांच्यासोबतचा दुसरा सहयोगी चित्रपट 'भहिरजी नाईक' मध्ये परतला . अभिनेत्री जयश्री गडकरसोबत सूर्यकांतची जोडी खूप गाजली, मोहित्यांची मंजुळा (१९६०), सुभद्रा हरण (१९६३), साधी मानसा (१९६५), पाटलाची सून (१९६६) यासह ७० चित्रपटांमध्ये एकत्र दिसले . अनंत माने यांच्या सांगते ऐका (१९५९) आणि दिनकर डी.पाटील यांच्या मल्हारी मार्तंड (१९६५) यांसारख्या ग्रामीण चित्रपट शैलीतील चित्रपटांसाठी ते प्रसिद्ध आहेत. सूर्यकांत यांचा जन्म २ जून १९२६ रोजी महाराष्ट्रातील कोल्हापूर येथे झाला. त्यांचे पालनपोषण त्यांचे आई-वडील, तनुबाई आणि तुकाराम नारायण मांढरे यांनी एका पारंपरिक कुटुंबात केले, तसेच त्यांचे मोठे भाऊ, चंद्रकांत हेही त्यांचे पालक होते. त्यांनी त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण कोल्हापूर येथील सरस्वती



विद्यालयात आणि त्यानंतर हरिहर विद्यालयात पूर्ण केले. वडिलांच्या तंदुरुस्तीवरील आग्रहामुळे प्रभावित होऊन, त्यांनी लहानपणापासूनच नियमित शारीरिक प्रशिक्षण घेतले, ज्यामुळे त्यांची शरीरयष्टी सुदृढ झाली. सूर्यकांत यांचा चित्रपटसृष्टीत प्रवेश १९३८ मध्ये झाला, जेव्हा वयाच्या बाराव्या वर्षी चित्रपट निर्माते भालजी पेंढारकर यांच्या नजरेत ते आले . त्याच वर्षी त्यांनी 'ध्रुवा' या चित्रपटातून पडद्यावर पदार्पण केले. सुरुवातीला ते अभ्यासासोबत अभिनयही करत होते, पण त्यांची आवड अधिकाधिक कलेकडे झुकली. १९४३ मध्ये, त्यांनी आपले औपचारिक शिक्षण पूर्ण केले आणि कलाकार बाबा गजबर यांच्याकडे चित्रकलेचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. नंतर त्यांना भालजी पेंढारकर दिग्दर्शित ' बहिरजी नाईक ' या चित्रपटात 'बाळशिवाजी' यांची भूमिका मिळाली. याच चित्रपटाच्या निर्मितीदरम्यान पेंढारकरांनी त्यांना 'सूर्यकांत' हे पडद्यावरील नाव स्वीकारण्याचा सल्ला दिला. हे नाव त्यांच्या चित्रपट कारकिर्दीसाठी अधिकृतपणे स्वीकारले गेले आणि त्यानंतर ते व्यावसायिकरित्या सूर्यकांत म्हणूनच ओळखले जाऊ लागले. त्यांची सुदृढ शरीरयष्टी आणि रांगडे व्यक्तिमत्व ही त्यांची ओळख बनली, ज्यामुळे ते ग्रामीण पार्श्वभूमीवरील मराठी चित्रपटांमधील भूमिकांसाठी विशेषतः योग्य ठरले. सूर्यकांत यांनी शाळेत शिकत असतानाच अभिनयाला सुरुवात केली आणि अनेक भूमिका साकारल्या, ज्यात बहुतेक नकारात्मक भूमिका होत्या.

लहानपणी त्यांना भालजी पेंढारकर आणि बाबा गजबर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना बाबा गजबर यांच्याकडून चित्रकलेचे आणि पेंढारकर यांच्याकडून चित्रपट निर्मितीचे ज्ञान मिळाले. शालेय शिक्षणादरम्यान सूर्यकांत यांचा कल चित्रकला आणि अभिनयाकडे होता. १९४३ मध्ये, त्यांनी भालजी पेंढारकर दिग्दर्शित 'बहिरजी नाईक' या चित्रपटात तरुण शिवाजी महाराजांची भूमिका साकारली . हा चित्रपट त्या वेळी खूप लोकप्रिय झाला आणि भालजी पेंढारकर यांनी त्यांचे नाव सूर्यकांत ठेवले. तेव्हापासून ते पुढील सर्व चित्रपटांमध्ये सूर्यकांत याच नावाने पडद्यावर दिसले.

सूर्यकांत मांढरे यांनी १०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. केतकी बनत , स्त्री जन्मा तुझी कहानी , ग्रह देवता , बाळा जो जो रे मधील नायकाची भूमिका केली आहे . अभिनेत्री जयश्री गडकरसोबतची त्यांची ऑन-स्क्रीन जोडी खूप लोकप्रिय झाली, दोघांनी ७० चित्रपटांमध्ये एकत्र काम केले. त्याचवेळी सुलोचना आणि उषा किरण यांच्यासोबतचे त्यांचे चित्रपटही गाजले. चित्रपटांसोबतच त्यांनी आगऱ्या, तुझे आहे तुजपाशी, लग्नाची बेदी, झुंजारराव, बेबंदशाही अशा अनेक नाटकांमध्ये काम केले. अशा या महान अभिनेत्याचा मृत्यू २२ ऑगस्ट १९९९ मध्ये पुणे येथे झाला. मराठीतील एक रांगडा, कलासक्त अभिनेता मराठी चित्रपटसृष्टीतून काळाच्या पडद्याआड गेला. मात्र त्यांच्या स्मृती आजही त्यांच्या चित्रपट व अभिनयाने कायम आहेत.

## टोइंग संदर्भात नियमांचा अभाव

अकोला शहरात वाहतुकीचे नियम पुन्हा लागू करणे स्वागतार्ह आहे. शहरातील वाहतूक नियमित करण्यासाठी नेकलेस रोडवरील सिव्हिल लाईन चौक आणि रतनलाल प्लॉट चौकात सिग्नल यंत्रणा लागू करण्यात आली आहे. बेशिस्त चालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक टोइंग पथकही तयार केले जाईल, अशी माहिती परिवहन विभागाचे प्रमुख विलास पाटील यांनी दिली. रस्त्यावर पार्क केलेल्या वाहनांवर कारवाई केली जाईल. पाटील यांनी आवाहन केले आहे की, प्रत्येक रस्त्यावर वाहने पिवळ्या रेषांच्या आतच पार्क करावीत. मात्र, जेव्हा शहरात टोइंग पथकाने पहिल्यांदा काम सुरू केले, तेव्हा रस्त्यांवर पिवळ्या रेषा नव्हत्या. त्यावेळी आम्ही या नगरपालिकेचे मनमानी व्यवस्थापन पाहिले. आजही पिवळ्या रेषांच्या बाहेर वाहने पार्क करणाऱ्यांवर निःसंशयपणे कारवाई केली जाईल. पण टोइंग पथके नागरिकांकडून पैसे उकळणे सुरूच ठेवतात नगरपालिका कर गोळा करण्याचे काम करत आहे. पिवळ्या पट्ट्याच्या नियमाव्यतिरिक्त आणखी बरेच नियम आहेत, परंतु नगरपालिका वाहन दिसत नाही. ज्या ठिकाणाहून ते ओढून नेण्यात आले, त्या ठिकाणी एक फलक लावण्यात आला आहे. दुसरीकडे, दुचाकी, तीनचाकी आणि चारचाकी वाहनांसाठीही टोइंग पथकांचा वापर केला पाहिजे. अकोलासारख्या शहरांमध्येही टोइंग पथके कार्यरत आहेत, याचा अर्थ सर्वप्रथम वाहनांसाठी पार्किंगची सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे.

मध्यवर्ती भागातील दुकाने, मॉल्स, संकुले, शासकीय इमारती, कार्यालये येथे वाहनांसाठी स्वतःची पार्किंगची सोय असावी अकोला शहरात ही सुविधा जवळजवळ अस्तित्वातच नाही. जिथे पार्किंग उपलब्ध नसते, तिथे कोणतीही कारवाई केली जात नाही. जर महापालिका वाहने टोइंग करण्याच्या प्रक्रियेत असेल, तर आधी नागरिकांना या सुविधा पुरवल्या पाहिजेत.

या सुविधांच्या अभावामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला विनाकारण झळ बसत आहे. नागरिकांकडून पैसे घेण्यापूर्वी पालिकेने या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, त्यानंतरच त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. जेणेकरून सामान्य नागरिकांना योग्य न्याय मिळेल, अशी अपेक्षा नगरपालिकेकडून आहे.

**प्रा. प्रज्ञानंद थोरात**

## खुले तेल विक्रीवरील निर्बंध अन्यायकारक

# गरिबांसाठी खुले तेल विक्रीला परवानगी द्या



## अन्न व औषध विभागाच्या आदेशाला तेल व्यापाऱ्यांचा विरोध

प्रतिनिधी २२ ऑगस्ट

**अकोला:** राज्याच्या अन्न व औषध विभागाने राज्यात खुल्या स्वरूपात खाद्यतेल विक्रीवर बंदी घालण्याचे आदेश दिल्याने तसेच जुन्या डब्यांचा वापर करण्या मनाई केली असून नियमांचे उल्लंघन केल्यास दहा वर्षापर्यंत कारावास आणि दहा लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद केल्याने खाद्यतेल व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या निर्णयामुळे सर्वात जास्त मरण गरिबांचे होणार आहे रोज कमवून खाणाऱ्या परिवारांचे या निर्णयाने सर्वाधिक हाल होणार आहेत अनेक ग्राहक असे आहेत की रोज 50 ग्राम ते 100 ग्राम खुले तेल दुकानदारांकडून विकत घेत दोन वेळचा स्वयंपाक करतात. कारण एकाच वेळेस अर्धा लिटर किंवा एक लिटर तेल घेणे त्यांना परवडत नाही. त्यामुळे तेल व्यापारी त्या निर्णयाला तीव्र विरोध करीत आहेत त्यांच्या मते खाद्यतेल विक्री हा गुन्हा किंवा दहशतवादी कृत्य आहे का की त्यासाठी दहा वर्षाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे लोकांच्या आरोग्यासाठी हानिकारक असलेल्या दारू आणि सिगारेटच्या खुल्या विक्रीवर अशा प्रकारची बंदी नसताना खाद्यतेलाच्या विक्रीवर निर्बंध का असा प्रश्नही व्यापारी करीत आहेत अन्न व औषध विभागाच्या आदेशामुळे ग्राहक आणि विक्रेते या दोघांवर ही परिणाम होणार असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे तसेच संबंधित व्यवसायामध्ये काम करणाऱ्या अनेकांच्या रोजगारावर संकट येण्याची सुद्धा शक्यता असल्याचे तेल व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे केंद्र एफएसएसएआय कडून आधीच नियम आणि कायदे अस्तित्वात आहेत त्यामुळे महाराष्ट्र अन्न व औषध विभागाला स्वतंत्रपणे एवढ्या कठोर तरतुदी करण्याची गरज काय? या निर्णयामागे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा दवा आहे का? पारंपारिक खाद्यतेल व्यापाऱ्यांचा व्यवसाय संपुष्टात आणून मोठ्या कंपन्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न तर नाही ना याची सरकारने स्पष्टता करावी अशी मागणीतील खाद्यतेल व्यापारी करीत आहेत.

### गरिबांच्या सोयीसाठी खुले तेल विक्रीला परवानगी द्या...!

» खुल्या तेलाच्या विक्रीवरील बंदीचा पुनर्विचार करण्याची मागणी शहरातील खाद्यतेल विक्रेते करीत आहेत पॅक बंद तेल विकणे व्यापाऱ्यांसाठी सोपे असले तरी गरीब ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन व्यापारी कमी प्रमाणात लूज तेल उपलब्ध करून देतात खुल्या तेलाच्या विक्रीची मागणी ही केवळ व्यापाऱ्यांच्या नफ्यासाठी नसून अल्प बजेटमध्ये घर चालवणाऱ्या कुटुंबाच्या गरजेची संबंधित आहे

## ई-पीक तपासणीच्या नावाखाली 50 ते 100 रुपयांची वसुली

**अकोला:** ई-पीक तपासणी प्रक्रियेच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून बेकायदेशीर वसुली होत असल्याचे उघड झाले आहे. केंद्रीय डीसीएस-एमएच (DCS-MH) ॲपद्वारे ११ ऑगस्ट रोजी ई-पीक तपासणी प्रक्रिया सुरू करण्यात आली. यासाठी प्रत्येक गावात सहाय्यकांची नियुक्ती करण्यात आली आहे. पीक तपासणीसाठी सरकारकडून सहाय्यकांना एक निश्चित मानधन दिले जाणार आहे आणि शेतकऱ्यांकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारू नये, अशा स्पष्ट सूचना आहेत. असे असूनही, काही सहाय्यकांनी प्रत्येक गटासाठी शेतकऱ्यांकडून ५० ते १०० रुपयांची मागणी केली आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, ते आधी स्वतःच त्यांच्या मोबाईल फोनचा वापर करून ई-पीक तपासणी करू शकतात.

पूर्वी ही तपासणी जागेवरच केली जायची आणि त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नव्हते. आता, सहाय्यकांची नियुक्ती केल्यानंतर, शेतकऱ्यांकडून प्रति शेत ५० ते १०० रुपये आकारले जात असल्याचे वृत्त आहे.



### सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नाकावर टिच्चून

## दिवसाढवळ्या वृक्षांची कत्तल

अर्जुन खिरोडकर २२ ऑगस्ट

**हिवरखेड:** तालुक्यातील रोडवरील कडूनिंबाची मोठे मोठी झाडे गेल्या तीन दिवसांपासून कापली जात आहे. अवैध कटाई चालू असुन या गंभीर बाबीकडे बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे साफ दुर्लक्ष होत असल्याने तालुक्यातील वृक्ष कटाई होउन झाडे नष्ट होण्याची शक्यता आहे.

दिवसा ढवळ्या वृक्षांची मशिनने अवैध कटाई करून छोटे छोटे तुकडे करुन खुलेआम वाहतूक सुरू आहे. या गंभीर बाबीकडे संबंधित अधिकारी यांचे दुर्लक्ष होत आहे. तालुक्यातील गोर्धा, तळेगाव बाजार रोडवर गेल्या तीन दिवसांपासून मोठ मोठ्या निंबांच्या झाडाची कटाई राजरोसपणे सुरू आहे. शासन दरवर्षी तालुक्यात हजारों वृक्ष लागवड करून कोट्यवधी रुपये खर्च करित आहे मात्र शासनाचे संबंधित अधिकारी वृक्ष मित्रांच्या फोनची दखल घेत नाही. वृक्ष कटाई थांबली नाही तर आंदोलन करू असा इशारा दिला आहे.

»अवैध कटाई चालू असताना शासनाचे अधिकारी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करीत आहेत. तालुक्यात होत असलेली अवैध कटाई बंद करावी अन्यथा आंदोलन छेडले जाईल.

**अमोल जवजांळ,**
वृक्ष मित्र संघटना तेल्हारा

»दिवसाढवळ्या रोडवरील मोठ मोठ्या वृक्षांची कटाई करु शकत नाही. संबंधित कटाई करणारे विरुद्ध वनविभागाच्या अधिकारी यांचेकडे तक्रार केली जाईल.

**जयेश गये,**
सार्वजनिक बांधकाम अधिकारी तेल्हारा

## आदिशक्ती साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ.श्रीकांत पाटील, उद्घाटक डॉ सतीश तराळ

प्रतिनिधी २२ ऑगस्ट



**अमरावती:** आदिशक्ती बहुउद्देशीय संस्था अमरावती यांच्याद्वारे होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कोल्हापूरचे प्रसिद्ध कादंबरीकार डॉ. श्रीकांत पाटील यांची निवड झाली असून संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे राज्याध्यक्ष डॉ. सतीश तराळ करणार आहेत.

प्रमुख अतिथी म्हणून खासदार अनिल बोंडे उपस्थित राहणार आहेत. संमेलनाच्या स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख आहेत.

हे संमेलन रविवार दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती येथे संपन्न होईल. या संमेलनाचे आयोजन अखिल भारतीय कुणबी मराठा क्षत्रिय महासंघ व मराठी विभाग मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय यांच्या सहकार्याने आदिशक्ती बहुउद्देशीय संस्था अमरावतीच्या अध्यक्ष डॉ. शोभा गायकवाड यांनी केले आहे.

या संमेलनात अतिथी म्हणून डॉ. अशोक पाटील इस्लामपूर, प्रा. डॉ. विलास आंबेकर अहमदनगर, समाजभूषण श्री प्रमोद पाटील ठोंबरे पुणे ,श्री पंढरीनाथ बोकारे वरिष्ठ पत्रकार नांदेड, श्री किसन परशराम बोंद्रे ठाणे व समाजसेवक सुदर्शनजी गांग अमरावती, प्रा डॉ सौ स्मिता दिनेश सूर्यवंशी नगरसेविका मनपा अमरावती. हे उपस्थित राहणार आहेत. या संमेलनात डॉ.सुभाष सावरकर यांचे मराठी साहित्यातील योगदान या विषयावर डॉ. निरंजन माधव अंजनकर नागपूर यांचे अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून सुप्रसिद्ध कवी राजाधर्माधिकारी अमरावती परतवाडा यांचे अध्यक्षतेखाली कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे .समारोप समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गाडगेबाबा अध्यासनाचे प्रमुख प्राचार्य डॉ.दिलीप काळे हे राहणार असून अतिथी म्हणून श्री पुरुषोत्तम गावंडे उपस्थित राहणार आहेत.

## जिल्ह्यात साखर निर्बंध साठा आदेश लागू

प्रतिनिधी २२ ऑगस्ट



**अकोला :** केंद्र शासनाच्या जीवनावश्यक वस्तु अंतर्गत साखर साठ्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. जिल्ह्यातील साखर व्यावसायिकांना साखरेची ४ हजार क्विंटल इतकी साठा मर्यादा (स्टॉक होल्डिंग लिमीट) निश्चित करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील नागरिकांना साखर वेळेत उपलब्ध व्हावी, साखरेच्या किमती नियंत्रीत राहाव्यात, साखरचे साठेबाजी होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे आवश्यक आहे. केंद्रशासनाच्या अधिसूचनेत नमुद केलेला साठा मर्यादा आणि इतर अटी निर्बंध आदेश संपूर्ण जिल्ह्यामध्ये लागू राहतील.

जिल्ह्यात जीवनावश्यक वस्तूअंतर्गत साखरेच्या व्यावसायिकांना ४ हजार क्विंटलपर्यंतचा साखर साठा करता येईल. तशी निर्बंध मर्यादा निश्चित करण्यात आलेली असून, संपुर्ण जिल्हयात सदरहू साखर मर्यादा निर्बंध आदेश पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

## 18 वर्षीय युवती बेपत्ता

प्रतिनिधी २२ ऑगस्ट

**मलकापूर :** तालुक्यातील लोणवडी येथील १८ वर्षीय युवती बेपत्ता झाल्याची तक्रार ग्रामीण पोलीस स्टेशनला दिल्यावरून मिसिंगची नोंद करण्यात आली आहे. सौ.शारदा बाबुराव सुरडकर रा.लोणवडी ता.मलकापूर यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, २१ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता नेहमीप्रमाणे घर कामकाज करणेसाठी उठली. असता मोठी मुलगी कु.वैष्णवी बाबुराव सुरडकर (वय १८ वर्ष) ही घरात दिसून आली नाही. त्यानंतर पती व मी घरात तसेच, शेजारी व गावात तिचा शोध घेतला असता ती मिळुन आली नाही. या फिर्यादीवरून मलकापूर ग्रामीण पोलिसांनी मिसींग नुसार हरवल्याची नोंद केली.

## चिंचोळकर यांची 'सा रे ग म प 'साठी निवड

प्रतिनिधी २२ ऑगस्ट

**अकोट :** अकोला जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. प्रतिभावंत गायक पियुषपाल गजानन चिंचोळकर यांची 'सा रे ग म प' कार्यक्रमासाठी निवड झाली आहे. पियुषपाल चिंचोळकर हे राष्ट्रीय कीर्तनकार सत्यपाल महाराज यांचे पुतणे आहेत. लहानपणापासूनच संगीताची आवड आणि गायनाची साधना जोपासणाऱ्या पियुषपाल यांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर अकोला जिल्ह्यात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या गुणी कलाकाराला मोठ्या प्रमाणात प्रेम, शुभेच्छा व आशीर्वाद देत 'सा रे ग म प'चा कार्यक्रम आवर्जून पाहावा आणि पियुषपाल चिंचोळकर यांना भरभरून पाठिंबा द्यावा, असे आवाहन संगीतप्रेमी व त्यांच्या चाहत्यांकडून करण्यात येत आहे.

## शिवसेना शहर प्रमुखाच्या मारहाणीस वेगळे वळण!

### चेन स्नैचिंगचा गुन्हा टाळण्यासाठी सोन्याची चेन केली पोलिसांकडे जमा

प्रतिनिधी २२ ऑगस्ट



**अकोला:** शहरातील खोलेश्वर परिसरात शिवसेना शहर प्रमुख रमेश गायकवाड यांना पोलीस कर्मचारी श्याम शर्मा आणि त्यांच्या मुलाने केलेल्या मारहाणीला आता वेगळे वळण मिळाले आहे. याप्रकरणी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या दोन्ही आरोपींवर कठोर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. या मारहाणीत शिवसेना शहर प्रमुख रमेश गायकवाड यांच्या गळ्यातील सोन्याची चेन सुद्धा शर्मा पोलीस पित व पुत्राने हिसकली होती. त्यामुळे त्यांच्यावर चेन स्नैचिंग चा गुन्हा सुद्धा दाखल करावा अशी मागणी रमेश गायकवाड यांनी केली होती. हे प्रकरण अंगाशी शेकणार हे लक्षात आल्याने तसेच चेन स्नैचिंग चा गुन्हा दाखल होऊ नये याकरिता पोलीस कर्मचारी शामसुंदर शर्मा आणि त्याच्या मुलाने त्र्यस्था मार्फत सोन्याची चेन सिटी कोतवाली पोलिसांकडे जमा केली. परंतु रमेश गायकवाड यांनी जोपर्यंत त्यांच्यावर चेन स्नैचिंग चा सुद्धा गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत चेन न घेण्याचा निर्णय घेतला. तसेच सोन्याच्या चेन ची कायदेशीर जप्ती करून तिचे वजन निश्चित करावे, तसेच ही चेन नेमकी किती वाजता व कोणाकडून जमा झाली याची रीतसर नोंद घ्यावी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत या संपूर्ण प्रकरणाचा तपास करावा अशी मागणी त्यांनी केली. कारण आरोपी पोलीस कर्मचारी असल्याने या प्रकरणी निष्पक्ष चौकशी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करावी अशी मागणी त्यांनी केली. या घटनेनंतर श्याम शर्मा आणि त्यांच्या मुलांने रमेश गायकवाड यांना केलेल्या मारहाणीचे पुरावे पोलिसांना मिळू नयेत यासाठी आपल्या मेडिकल बाहेर लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे त्वरित गायब केले. या सीसीटीव्ही कॅमेराच्या फुटेज ची सुद्धा पोलिसांनी चौकशी करावी अशी मागणी रमेश गायकवाड यांनी केली आहे. श्याम शर्मा यांनी मारहाण व शिवीगाळ करीत खाकी वर्दीचा धाक दाखवून खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी सुद्धा गायकवाड यांना दिल्याने त्यांना पोलीस संरक्षण मिळावे अशी मागणी सुद्धा त्यांनी केली.

## 'सलाह डायग्नोस्टिक अँड इमेजिंग सेंटर'चे दिमाखदार उद्घाटन!

### उद्घाटन समारंभास मान्यवर अतिथींची उपस्थिती

प्रतिनिधी २२ ऑगस्ट



**अकोला:** सर्व अत्याधुनिक सुविधा आणि आधुनिक उपकरणांनी सज्ज 'सलाह डायग्नोस्टिक अँड इमेजिंग सेंटर'चे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. उच्चशिक्षित रेडिओलॉजिस्ट डॉ. सदाफ सिमीन आणि डॉ. अवैस अली यांच्याद्वारे संचलित 'सलाह डायग्नोस्टिक अँड इमेजिंग सेंटर'मधील अत्याधुनिक उपकरणांमुळे शहरवासीयांसाठी दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध झाली आहे.

अकोला शहरातील दीपक चौक परिसर येथे आणि सनशाईन हॉस्पिटलसमोर उच्चशिक्षित रेडिओलॉजिस्ट डॉ. सदाफ सिमीन व डॉ. अवैस अली या दांपत्याद्वारे संचलित 'सलाह डायग्नोस्टिक अँड इमेजिंग सेंटर'चे उद्घाटन मान्यवर अतिथींच्या उपस्थितीत पार पडले. डॉ. सदाफ सिमीन यांच्या पूज्य आईंच्या (अम्मीजी) हस्ते फित कापून सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी जमाते इस्लामी हिंद अकोलाचे अध्यक्ष डॉ. अहमद उरोज मुदस्सीर, सर्जन डॉ. हुजैफा, डॉ. आयशा मॅम (एमडी), ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. इकरार राजा, गायनॉकॉलॉजिस्ट डॉ. महविश मॅम, डॉ. एहतेशाम देशमुख (एमडी), मौलाना तौफेल नदवी साहेब, मिल्लत स्कूलचे सरफराज खान आणि हॉटेल जमजमचे संचालक युनूस शेख आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी सेंटरचे संचालक डॉ. सदाफ सिमीन आणि डॉ. अवैस अली यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. डॉक्टर दांपत्याकडूनही सर्व मान्यवरांचे योग्य ते स्वागत करण्यात आले.

डॉ. सदाफ सिमीन व डॉ. अवैस अली यांनी सांगितले की, "येथे सर्व आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने पोटासंबंधी तसेच गरोदरपणाशी संबंधित सर्व आजारांचे अचूक निदान (Accurate Diagnosis) केले जाईल. येथे प्रेग्नन्सी अँड ऑब्स्टेट्रिक स्कॅन, एनटी अँड ॲनोमाली स्कॅन, ग्रोथ अँड डॉपलर स्टडीज, ॲब्डोमेन अँड पेल्व्हिस, व्हॅस्कुलर अँड कलर डॉपलर, यूएसजी गायडेड प्रोसिजर आणि इतर अल्ट्रासाऊंड सेवा उपलब्ध असतील. "सर्व घटकांतील लोकांना उत्तम आरोग्य सुविधा देणे हा 'सलाह डायग्नोस्टिक अँड इमेजिंग सेंटर' सुरू करण्याचा मुख्य उद्देश आहे. मोठ्या शहरांच्या तुलनेत कमी खर्चात अत्याधुनिक उपकरणांद्वारे उत्तम तपासणी होईल. नागरिकांना उत्तम तपासणी सुविधा मिळाल्यामुळे वेळेवर उपचार होतील, तसेच वेळ आणि पैसे दोघांचीही बचत होईल," अशी माहिती डॉ. सदाफ सिमीन आणि डॉ. अवैस अली यांनी दिली.

# ग्रामपंचायतींच्या कारभारावर डिजिटल नजर

### कुरुम-चिखली कादवीतील आरोपांमुळे पारदर्शकतेची कसोटी

प्रतिनिधी २२ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** गावाच्या विकासाची नांदी ठरणाऱ्या ग्रामपंचायतींच्या कारभारात पारदर्शकता, आर्थिक शिस्त आणि विकासकामांची गुणवत्ता या बाबींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुरुम आणि चिखली कादवी ग्रामपंचायतींच्या कारभाराबाबत विविध आरोप व तक्रारी समोर आल्यानंतर मूर्तिजापूर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय कामकाजावर पुन्हा एकदा चर्चेची झळ पोहोचली आहे. मात्र, आरोपांच्या धुरळ्यातून निष्कर्ष काढण्याऐवजी कागदोपत्री नोंदी, प्रत्यक्ष पाहणी आणि अधिकृत चौकशीच्या माध्यमातून सत्य परिस्थिती उजेडात आणणे आवश्यक ठरणार आहे.

कुरुम ग्रामपंचायतीच्या स्मशानभूमीसाठी मंजूर करण्यात आलेल्या सुमारे १ लाख ३४ हजार रुपयांच्या सोलर हायमास्ट प्रकल्पाच्या कामाबाबत प्रत्यक्ष स्थिती, खर्च आणि निधीच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे कचराकुंडी खरेदीच्या प्रकरणाचीही चौकशी करण्याची मागणी पुढे आली आहे. त्यामुळे संबंधित कामांची प्रशासकीय मंजुरी, अंदाजपत्रक, निधी वितरण, प्रत्यक्ष खर्च, देयके तसेच कामाची सद्यस्थिती यांची सखोल तपासणी होणे गरजेचे आहे. शासनाच्या डिजिटल प्रणालीमुळे ग्रामपंचायतींच्या विकासकामांशी संबंधित अनेक बाबी नागरिकांना उपलब्ध होण्याचा मार्ग खुला झाला आहे. एखाद्या कामाला किती निधी मंजूर झाला, कामाची अंदाजित किंमत किती आहे, निधीचा विनियोग कसा झाला, लाभार्थी कोण आहेत, देयके अदा झाली का आणि कामाची प्रगती किती आहे, यासारख्या बाबींची माहिती डिजिटल माध्यमातून पडताळून पाहता येणे ही प्रशासनातील पारदर्शकतेच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे. यामुळे ग्रामपंचायतींच्या कारभारात नागरिकांचा सहभाग केवळ मतदानापुरता मर्यादित न राहता विकासकामांच्या देखरेखीपर्यंत पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सार्वजनिक निधीचा प्रत्येक रुपया योग्य ठिकाणी आणि नियमानुसार खर्च झाला आहे का, याबाबत नागरिकांना प्रश्न विचारण्याचा आणि माहिती जाणून घेण्याचा अधिकार आहे. मंजूर कामाच्या कागदपत्रांमध्ये नमूद केलेली माहिती आणि प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती यामध्ये तफावत आढळल्यास त्याची अधिकृत चौकशी होणे आवश्यक आहे. यासाठी मंजुरी आदेश, अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका, बिल-वाऊचर, लाभार्थी नोंदी, कामाची प्रत्यक्ष पाहणी तसेच संबंधित अधिकाऱ्यांचे अहवाल तपासणे गरजेचे आहे.

## ईद-ए-मिलाद शांततेत साजरी करण्याचे आवाहन



प्रतिनिधी २२ ऑगस्ट

**अकोला:** ईद-ए-मिलाद सणाच्या पार्श्वभूमीवर अकोला पोलीस प्रशासनाने शांतता आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन केले. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली धर्मगुरू आणि समाजप्रमुखांशी विविध मुद्द्यांवर महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. आगामी ईद-ए-मिलाद सण शांततेत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी अकोला पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. या अनुषंगाने पोलीस लॉन येथे आयोजित विशेष बैठकीत मिरवणूक मार्ग, वाहतूक नियोजन, पोलीस बंदोबस्त आणि कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. शहरात सामाजिक एकता, बंधुभाव आणि शांतता कायम राहावी यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. तसेच हा सण आनंदाने आणि शिस्तीने साजरा करण्यासाठी धर्मगुरू व समाजप्रमुखांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या बैठकीस पत्रकार आणि प्रसारमाध्यमांनी उपस्थित राहून शांततेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन करण्यात आले. अकोला पोलीस या सणासाठी पूर्णपणे तयार आहेत.

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# पोर्टलवर 24 हजार गोण्या, दुकानांत 'नो स्टॉक'

## महागावात खतांची साठेबाजी?, कृषी विभाग सुस्त

प्रतिनिधी २२ ऑगस्ट

**फिरोज पठाण**

■ कृषी विभागाच्या ऑनलाइन पोर्टलवरील आकडेवारी थक्क करणारी आहे. तालुक्यातील ३३ दुकानांमध्ये डीएपीच्या ५,६७४ गोण्या, तर ४८ दुकानांत युरियाच्या १८,६३६ गोण्या शिल्लक असल्याचे नोंदवले गेले आहे. कागदावर खताचा मोठा साठा उपलब्ध असताना प्रत्यक्ष दुकानांत शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने का परतावे लागत आहे? हा 'गायब' झालेला खतसाठा गेला कुठे, असा सवाल आता विचारला जात आहे.

**महागाव :** खरीप हंगामात एकीकडे पिके वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू असताना, दुसरीकडे महागाव तालुक्यात डीएपी आणि युरिया खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे.

कृषी विभागाच्या 'ऑनलाइन' पोर्टलवर खतांचा मुबलक साठा दिसत असताना प्रत्यक्ष दुकानांवर मात्र "स्टॉक संपलाय, नंतर या" अशी उत्तरे मिळत आहेत. या प्रकारामुळे कृषी केंद्रांकडून खतांची बेकायदेशीर साठेबाजी सुरू असून, यात कृषी विभागाची गुप्त संमती आहे का, असा खळबळजनक सवाल उपस्थित होत आहे.

पेरणीनंतर पिकाला खताची नितांत गरज असते. नेमक्या याच वेळी शेतकरी एका दुकानातून दुसऱ्या दुकानात पायपीट करत आहेत. ऑनलाइन आणि प्रत्यक्ष दुकानांतील खतांच्या साठ्यात इतकी मोठी तफावत असतानाही कृषी अधिकारी मात्र ढिम्म बसून आहेत. कृषी केंद्र चालकांची ही मनमानी रोखण्यासाठी कोणतीही ठोस मोहीम राबवली जात नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

दुकानांमध्ये प्रत्यक्ष जाऊन डीएपी व युरियाच्या साठ्याची तपासणी (फिजिकल व्हेरीफिकेशन) त्वरित करावी. कृत्रिम तुटवडा दाखवणाऱ्या व जास्त दराने खत विकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून परवाने रद्द करावेत. प्रत्येक दुकानाबाहेर रोज सकाळी उपलब्ध खत आणि त्याच्या दराचा फलक लावणे सक्तीचे करावे.

## 'शनिवारी विज्ञान वारी': दोन दिवसीय विज्ञान प्रसारक प्रशिक्षण शिबिर

प्रतिनिधी २२ ऑगस्ट

**यवतमाळ :** मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या "शनिवारी विज्ञान वारी" या उपक्रमाअंतर्गत २२ व २३ ऑगस्ट २०२६ रोजी दोन दिवसीय मोफत विज्ञान प्रसारक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर मोहा, बोरगाव डॅम रोड येथील 'महर्षी विद्या मंदिर' येथे सकाळी ९:३० ते सायंकाळी ५:०० या वेळेत पार पडेल. विज्ञान प्रसाराची आवड असणाऱ्या बी.एस्सी. द्वितीय वर्षातील एकूण ६० विद्यार्थ्यांची या प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार असून, यामध्ये यवतमाळ विभागातून २० विद्यार्थ्यांना संधी मिळणार आहे. सर्व प्रशिक्षणार्थींना प्रयोग साहित्याची पेटी (किट), प्रयोग कृती पुस्तिका आणि दोन्ही दिवस चहा, नाश्ता व भोजनाची मोफत सोय केली जाईल. शाळांमध्ये प्रात्यक्षिके: प्रशिक्षणानंतर दोन विद्यार्थ्यांच्या जोडीने निवडलेल्या शाळेत इयत्ता ६ वी किंवा ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सलग १० शनिवारी विज्ञानविषयक १० सत्रे घेणे बंधनकारक राहील. मानधन व प्रमाणपत्र: उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करून मुंबई केंद्राकडे अहवाल सादर केल्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांना मानधन आणि सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

## शेलूतील पशुवैद्यकीय दवाखान्याची इमारत जीर्ण

### सुसज्ज नवीन इमारत उभारा; दिनेश कर्णेवार आक्रमक





प्रतिनिधी २२ ऑगस्ट

**आर्णी :** छताचे गळणारे पाणी, भिंतींना पडलेले मोठे तडे व कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या स्थितीत असलेले छत... ही भीषण अवस्था आहे आर्णी तालुक्यातील शेलू (शेंदूरसनी) येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची. जीर्ण इमारतीमुळे शेतकरी, कर्मचारी आणि मूक जनावरांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, ही धोकादायक इमारत पाडून त्वरित नवीन सुसज्ज इमारत उभारावी, अशी जोरदार मागणी शिवसेनेचे विभाग प्रमुख दिनेश कर्णेवार यांनी केली आहे.



शेलू व परिसरातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी हा दवाखाना उपचाराचे मुख्य केंद्र आहे. दैनंदिन उपचारासाठी येथे पशुपालकांची मोठी वर्दळ असते. मात्र, पावसाळ्यात छताला लागणाऱ्या गळतीमुळे औषधांचा साठा व वैद्यकीय साहित्य खराब होत असून उपचारात मोठा खोळंबा निर्माण होत आहे. इमारतीची बिकट अवस्था पाहता येथे मोठा अपघात घडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन नव्या इमारतीसाठी निधी मंजूर करावा व काम सुरू करावे.

पशुवैद्यकीय सेवा सुरळीत व सुरक्षित वातावरणात मिळाव्यात, यासाठी शासनाने दिरंगाई न करता तत्काळ निर्णय घ्यावा, अशी मागणी परिसरातील संतप्त पशुपालकांनीही निवेदनाद्वारे केली आहे.

# अखंडित विजेसाठी राणी अमरावतीतील शेतकरी आक्रमक

## महावितरणला आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी २२ ऑगस्ट

**बाभुळगाव :** पावसाने मारलेल्या ओढीमुळे हाताशी आलेली पिके वाळू लागली असून, ती वाचवण्यासाठी शेतीला अखंडित वीजपुरवठा करावा आणि नवीन डीपी त्वरित सुरू करावी, अशी मागणी राणी अमरावती (जि. यवतमाळ) येथील शेतकऱ्यांनी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषण छेडण्याचा इशारा महावितरणचे उपअभियंता दहेकर यांना दिलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला.

शासनाकडून आठ तास वीज देण्याचे दावे केले जात असले, तरी करळगाव फीडरवर वारंवार वीज खंडित होत असल्याचा संताप शेतकऱ्यांनी व्यक्त केला. या फीडरवर पाच लाईनमन कार्यरत असूनही दिवसभरात १० पेक्षा जास्त वेळा वीज घालवली जाते. आठ तासांपैकी चार तास लाईन बंदच राहत असल्याने पिकांना पाणी देणे अशक्य झाले आहे. कडक उन्हामुळे पिके करपून जात असल्याने दिवसभरात किमान १२ तास सुरळीत वीजपुरवठा करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या:** स्वतंत्र फीडर: राणी अमरावती फीडर तातडतोब वेगळे करण्यात यावे. नवीन डीपीची जोडणी: बसवलेली नवीन डीपी त्वरित सुरू करून जोडणी द्यावी. वीज खंडितता बंद: करळगाव फीडरवरील वारंवार ट्रिपिंग होणारा वीज पुरवठा थांबवावा. सिंगल फेज सुविधा: रात्रीच्या वेळी सिंगल फेज वीजपुरवठा सुरळीत सुरू ठेवावा. या निवेदनावर श्रीकृष्ण परोपटे, सतीश मेंढे, रफियोद्दीन काझी, आरीफ खान, भूषण जयसिंगपुरे, विजय हाडेकर, रामगरम पतालिया, किसन दातार या शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बेंबळा विसर्ग : कृषी व तहसील कार्यालयावर धडक

## कृषी विभागाचा 'फसवा' अहवाल जाळून निदर्शने

प्रतिनिधी २२ ऑगस्ट

### आंदोलकांच्या प्रमुख मागण्या

■ शेतजमीन व शेती साहित्याच्या नुकसानीचे त्वरित पुनर्सर्वेक्षण करण्यात यावे. बाधित शेतकरी, तलाठी, कृषी सहाय्यक व पीक विमा कंपनीच्या प्रतिनिधींची तातडीने संयुक्त बैठक आयोजित करावी. कागदोपत्री आकडेवारीची हेराफेरी थांबवून बाधित सर्व शेतकऱ्यांना प्रत्यक्ष नुकसानीनुसार भरपाई मिळावी.

**बाभूळगाव :** बेंबळा धरणातून जुलैच्या शेवटी केलेल्या विसर्गामुळे उद्ध्वस्त झालेल्या बाभूळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी शुक्रवारी कृषी आणि तहसील कार्यालयावर धडक दिली. प्रशासनाने शासनाला सादर केलेला नुकसानीचा अहवाल अत्यंत फसवणूक करणारा असल्याचा आरोप करत संतप्त शेतकऱ्यांनी कृषी अधिकारी कार्यालयासमोर या अहवालाची जाहीर होळी करून तीव्र निषेध नोंदवला.

३० व ३१ जुलै रोजी झालेल्या बेसुमार विसर्गामुळे तालुक्यातील १२ ते १३ गावांमधील हजारो शेतकऱ्यांची शेतजमीन अक्षरशः खरडून गेली असून उभी पिके नष्ट झाली आहेत. मात्र, स्थानिक कृषी सहाय्यक व तलाठी यांनी केलेल्या सर्वेक्षणात खरडून गेलेल्या जमिनीचे क्षेत्र अवघे दीड हेक्टर तर दुरुस्तीयोग्य जमीन अवघी १६० हेक्टर दाखवण्यात आली आहे. ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान होऊनही कागदावर मात्र हे क्षेत्र अत्यंत कमी दाखवून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.




यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन तहसीलदार व कृषी अधिकाऱ्यांना सादर केले. या आंदोलनात विसर्ग नुकसानीचे अभ्यासक प्रा. घनश्याम दरणे, अरविंद महानोर, शैलेश चौधरी, अमोल गोडे, प्रभाकर अजाबले, निशांत चौधरी यांच्यासह बाधित गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीक विम्यासाठी केंद्रीय कृषी मंत्र्यांकडे पाठपुरावा करणार ना - रामदास आठवले

## शिष्यवृत्ती व जात पडताळणीचा आढावा

प्रतिनिधी २२ ऑगस्ट

■ विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची तसेच जात पडताळणी प्रकरणांचीही राज्यमंत्री आठवले यांनी माहिती घेतली. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याचा विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. जात पडताळणीची एकूण १,९५४ प्रकरणे असून त्यापैकी १,२०० प्रकरणे तयार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. उर्वरित प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत असल्याचेही सांगण्यात आले.

**यवतमाळ :** जिल्ह्यातील विविध विषयांसह केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या योजनांबाबत केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे सविस्तर आढावा घेतला.

बैठकीस जिल्हाधिकारी विकास मीना, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प अधिकारी आनंद इंगले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी युवराज म्हेत्रे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी मंगला मुन, नगरविकासचे येमाजी धुमाळ यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार व पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री रामदास आठवले यांनी यवतमाळसह राज्यातील पीक विम्यापासून वंचित जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळावा, यासाठी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

या बैठकीत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी यवतमाळ शहरातील स्टेट बँक चौक येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारण्याबाबतही माहिती घेतली. या पुतळ्यासाठी ८९४८ चौ. फूट जागा शासन जमा करण्यात आली असून नगरपरिषदेला हस्तांतरित करावी. तसेच पुतळा समितीची बैठक घेऊन प्रस्ताव शासनाकडे पाठवावा असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी पुतळा, वाचनालय व इतर अनुषंगिक कामांसाठी सुमारे ५ कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित असल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी जिल्ह्यातील अॅट्रॉसिटी प्रकरणांचा आढावा घेताना प्रकरणातील मृतांच्या २४ वारसांना शासकीय सेवेत सामावून घेतल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

भूमिहीनांना कसण्यासाठी गायरान, भूदान तसेच झुडपी जंगलाच्या जमिनी उपलब्ध करून देण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली.

उमरखेड तालुक्यातील चिंचोली संगम येथील पुनर्वसनाचा प्रश्न सोडविण्यासाठी नव्याने प्रस्ताव तयार करून शासनास सादर करण्याच्या सूचना केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिल्या. शासन या विषयावर सकारात्मक असून संबंधितांना प्रधानमंत्री आवास योजना तसेच रमाई आवास योजनेचा लाभ देण्यात येणार असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले.

यावेळी सामाजिक न्याय विभागांतर्गत सुरू असलेल्या मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांतील विद्यार्थी संख्या, वसतिगृहांची क्षमता तसेच निवासी आश्रमशाळांची माहिती घेण्यात आली. याशिवाय प्रधानमंत्री जनधन योजना, मुद्रा कर्ज, उज्ज्वला योजना, रमाई आवास, पीएम आवास योजना, आंतरजातीय विवाह, दिव्यांग, सफाई कामगार, वृद्धाश्रम तसेच साहित्यिक व कलावंतांच्या मानधनाच्या प्रकरणांचाही आढावा घेण्यात आला.

# वामनदादांच्या गीतांनी उजाळली चळवळीची पाने

## पांढरकवडा येथे १०४ व्या जयंतीनिमित्त संगीतमय अभिवादन कार्यक्रम

प्रतिनिधी २२ ऑगस्ट

**पांढरकवडा :** आंबेडकरी चळवळीतील प्रसिद्ध कवी-गीतकार महाकवी वामनदादा कर्डक यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त आयोजित "वामनदादांची गाणी" या संगीतमय अभिवादनपर कार्यक्रमात वामनदादांची गाजलेली प्रसिद्ध गाणी सादर करून महाकवी वामनदादा कर्डक यांना आदरांजली अर्पण करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले.

संविधानपर्व २०२६- संयुक्त सार्वजनिक जयंती समिती तथा बोधिसत्व प्रबोधन अकादमी, पांढरकवडा यांच्या वतीने ज्ञानदीप बुद्ध विहार, शास्त्रीवार्ड पांढरकवडा येथे या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. 'मी वादळ वारा', 'माणसा इथे मी तुझे गीत गावे', 'भीम माझा लढे देत होता', 'भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते', 'तुफानातले दिवे', 'उद्धरली कोटी कुळे', 'चांदण्याची छाया', 'भिमा तुझ्या महुला' इत्यादी अजरामर गीतांनी या वेळी आंबेडकरी चळवळीची पाने उजाळून निघाली.

या संगीतमय मेजवानीत प्रा. डॉ. विश्वजीत कांबळे, रामचंद्र नगराळे, भीमराव जीवने, अरुण नरांजे, सिद्धार्थ कांबळे, पुष्पा वनकर, हेमलता डोंगरे, चंदा नरांजे, सूर्यभान कवाडे आणि रंजना दवलकर यांनी वामनदादांची गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. गायकांना संगीताची साथ देताना ढोलकवर विरेंद्र उदकांडे, तबल्यावर आदर्श कवाडे तर हार्मोनियमवर भुषण बावणे यांनी बहारदार जुगलबंदी केली. प्रा. डॉ. विश्वजीत कांबळे यांनी आपल्या अभ्यासू शैलीत बहारदार सूत्रसंचालन केले, तर रवी रामटेके यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. सुधीर बनसोड, उमेश मेश्राम, अॅड. निलमणी मनवर, राहुल नरांजे, बाळू वानखडे, प्रशांत नरांजे, दिलीप नरांजे, राहुल जोगदंडे व रमेश भगत यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच ज्योती ठमके, प्रीती शिंदे, शोभा भगत, पुष्पाताई पळवेकर, लुमा गेडाम, मालाबाई कशाळकर, संध्या जगताप, आशा ठमके, मीना आकेवार, गयाबाई नरांजे, शेवंता वनकर, तानबा शेंद्रे, बंडू जगताप, दिनेश वनकर आणि दवलकर काकू यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमास परिसरातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिवासी विद्यार्थी व तरुणांचे विविध मागण्यांसाठी तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी २२ ऑगस्ट



**झरी-जामणी :** आदिवासी विद्यार्थी, बेरोजगार युवक व समाजाच्या प्रलंबित समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी झरी-जामणी येथील आदिवासी तरुणांच्या वतीने तहसीलदारांमार्फत महामहिम राष्ट्रपती, राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले. शासनाने मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक पावले न उचलल्यास संपूर्ण तालुक्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील प्रलंबित पदभरती त्वरित सुरू करावी, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. MPSC गट-क अंतर्गत तलाठी पदाच्या रिक्त जागा पेसा जिल्ह्यांमध्ये उपलब्ध करून जाहिरात प्रसिद्ध करावी, शिक्षक भरतीमध्ये (पवित्र प्रणाली) आदिवासी उमेदवारांना न्याय द्यावा तसेच विशेष मेगा भरतीतील १२,५०० पदे तातडीने भरावीत, असा आग्रह धरण्यात आला.

निवेदनातील प्रमुख मागण्या: वसतिगृह व डीबीटी: ५ ऑगस्ट २०२६ रोजीचा वसतिगृहाबाबतचा जीआर रद्द करावा आणि भोजनाची थेट 'डीबीटी' (DBT) पद्धत बंद करून पूर्वीप्रमाणे प्रत्यक्ष भोजन व्यवस्था सुरू करावी.

टीआरटीआय व बिंदूनामावली: TRTI प्रशिक्षणातील वयोमर्यादेची अट रद्द करून स्पर्धा परीक्षा वर्ग सुरू करावेत. पदभरतीची बिंदूनामावली (Roster) पूर्ववत करून बिंदू क्र. २ वर आणावी. वसतिगृह व आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचा १० लाखांचा विमा उतरावा; बोगस जात वैधता कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करावे. गडचिरोली आश्रमशाळा हत्या प्रकरणातील दोषींवर गुन्हे दाखल करून पीडित कुटुंबाला १ कोटींची मदत द्यावी. तसेच आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी राजीनामा द्यावा आणि पंडित दीनदयाल योजना महापुरुषाच्या नावाने सुरू करावी.

निवेदन देतेवेळी नगरसेवक कालिदास अर्के, मोरेश्वर कोडापे, प्रशांत किनाके, दिनेश मडावी, बंडू आडे, रमेश आत्राम, रणजीत तोडसाम, माधवराव आत्राम, विठ्ठल उईके, वासुदेव तोडसाम यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी विद्यार्थी व बेरोजगार तरुण उपस्थित होते.

# 'मी उमरखेडचा डॉन आहे' म्हणत अल्पवयीनावर चाकूने हल्ला

## फरार आरोपी जेरबंद; पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी २२ ऑगस्ट

**उमरखेड :** "मी उमरखेडचा डॉन आहे, माझ्या नादाला लागू नको," असे धमकावत एका अल्पवयीन मुलाच्या डोक्यात चाकूने वार करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी अखेर बेड्या ठोकल्या आहेत.

आकाश रविप्रसाद दीक्षित (२३, रा. शिवाजी वॉर्ड, उमरखेड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास अल्पवयीन फिर्यादी हा आपल्या मित्रांसह महागाव रोडवरील वखार महामंडळाच्या गोडाऊनजवळ फोटो काढत होता.

त्यावेळी तेथे आलेल्या आरोपी आकाश दीक्षित याने क्षुल्लक कारणावरून हुज्जत घालत स्वतःला 'डॉन' घोषित केले आणि जवळील लोखंडी चाकूने फिर्यादीच्या डोक्यात सपासप वार केले.



यात मुलगा गंभीर जखमी झाला होता. या घटनेनंतर गुन्हा दाखल होताच आरोपी शहरातून पसार झाला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी आरोपीला तातडीने अटक करण्याचे निर्देश पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांना दिले होते.

आरोपी इतर जिल्ह्यात पळून गेला होता; मात्र तो शहरात परत आल्याची गोपनीय माहिती डी.बी. पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे यांना मिळाली.

पथकाने तत्काळ सापळा रचून आरोपीच्या मुसक्या आवळल्या. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमर खिलारे करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते व ठाणेदार शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय शरद लोहकरे, पीएसआय अमर खिलारे, सहायक फौजदार विजय पतंगे, संदीप ठाकूर, अतुल तांगडे, चंदन जाधव, संघशील टेंभरे, विष्णू राठोड, दिगांबर गिते व निवृत्ती महाळनवर यांच्या पथकाने केली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे उमरखेडमधील गुन्हेगारांवर चांगलाच वचक निर्माण झाला आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय द्वारा अॅड राजेश शहा बिल्डींग (लाला बिल्डींग समोर ) अवधूतवाडी यवतमाळ ता. जि. यवतमाळ येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** संपर्क - 0724 - 2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135